# जिल्हा परिषद, कोल्हापूर

## जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात

**जाहिरात क्रमांक : ०१/२०२१, दिनांक : २५/०८/२०२१**

**(ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. : संकीर्ण २०२०/प्र.क्र.९९/आस्था८, दि. २० ऑगस्ट, २०२१ चे सहपत्र)**

**विवरणपत्र अ**

**(जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील आरोग्य विभागाशी संबंधित पदभरतीबाबत जाहीर प्रकटन)**

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट-क संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी माहे मार्च, २०१९ मध्ये शासनाच्या महाआयटीमार्फत महापोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु तत्कालीन परिस्थितीत महापोर्टल बंद झाल्याने सदरची परीक्षा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. दरम्यान कोविड १९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर तसेच इतर साथरोगांची शक्यता लक्षात घेता, ग्रामीण भागातील जनतेला तत्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्राम विकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य सेवक (पुरुष), आरोग्य सेवक (महिला) औषध निर्माण अधिकारी या संवर्गातील माहे मार्च, २०१९ मध्ये दिलेल्या जाहिरातीमधील नमूद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**माहे मार्च, २०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबंधित पदांकरिता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-**

१) माहे मार्च, २०१९ मधील जाहिरातीनुसार आरोग्य विभागाशी संबंधित पदांकरिता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन Login ID व Password create करणे आवश्यक आहे.

२) माहे मार्च, २०१९ मध्ये आरोग्य सेवक (पुरुष), आरोग्य सेवक (महिला), औषधनिर्माण अधिकारी या संवर्गाकरिता आवेदन पत्र / अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रवर्गातून अर्ज सादर केलेले उमेदवार संबंधित प्रवर्गातून परीक्षेकरिता पात्र राहतील.

३) मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमध्ये शासकीय नोकऱ्यांमध्ये नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द ठरविले आहे. सामान्य प्रशासन विभागाने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत क्र. राआधो-४०१९/प्रक्र.३१/१६-अ, दिनांक २३ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातून (EWS) आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छिक असेल. या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गाबाबत (EWS) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरीलप्रमाणे नमूद **संकेतस्थळावर दिनांक १ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१** या कालावधीत विकल्प द्यावेत. उमेदवाराने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तथापि, ज्या एसईबीसी (SEBC) प्रवर्गातील उमेदवाराने ईडब्ल्यूएस (EWS) प्रवर्गाचा विकल्प दिला आहे, त्याने **परीक्षेपूर्वी** सक्षम अधिकाऱ्यांचे ईडब्ल्यूएस (EWS) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जि. प., कोल्हापूर यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे ईडब्ल्यूएस (EWS) प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

४) जे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाहीत अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणून गणण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी लागू असलेले परीक्षा शुल्क (यापूर्वी एसईबीसी प्रवर्गातून अदा केलेली रक्कम वगळता उर्वरित रक्कम) परीक्षपूर्वी अदा करणे आवश्यक राहील. सदर उमेदवारांनी दिनांक १ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीत वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावरून शुल्क अदा करण्याचे उपलब्ध पर्याय वापरून शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

५) औषध निर्माता या संवर्गामध्ये एस.ई.बी.सी. आरक्षण रद्द झालेने महिला (खुला) प्रवर्गासाठी १ पद निर्माण झाले आहे. माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीमध्ये खुला प्रवर्गातून ज्या महिला उमेदवारांनी अर्ज भरले असतील, त्या उमेदवारांना महिला (खुला) या समांतर आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास, त्यांनी विकल्प वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर **दिनांक १ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर, २०२१** या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहील.

६) माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परीक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरीक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधित पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पद्धतीने राबविणेत येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परीक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधून परीक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरिता अर्ज सादर केले आहेत, अशा उमेदवारांनी परीक्षेकरिता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर **दिनांक १ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर, २०२१** या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहील.

तसेच, अनुकंपा नियुक्ती व इतर कारणामुळे माहे मार्च, २०१९ जाहिरातीतील काही प्रवर्ग रद्द झाले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद, कोल्हापूरकडील औषध निर्माता संवर्गामध्ये SBC विमाप्र या प्रवर्गाचे १ पद कमी झालेले आहे. सदर प्रवर्गातर्गत माहे मार्च २०१९ मध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी संबंधित प्रवर्गातून वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर **दिनांक १ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर, २०२१** या कालावधीत इतर जिल्हा परिषदेचा विकल्प नोंदविणे आवश्यक राहील.

७) नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगांच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर यापूर्वी माहे मार्च २०१९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार खुला अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल; तसेच यापूर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगांच्या पदनिहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगांकरिता नव्याने प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार विकल्प देणे आवश्यक आहे.

८) यापूर्वी उमेदवारांकडून लेखी परीक्षेस प्रत्यक्ष कोणत्या परीक्षा केंद्रामधून परीक्षा देणार आहे, त्या परीक्षा केंद्राबाबत प्राधान्यक्रम घेण्यात आले होते. सदर प्राधान्यक्रमानुसार उमेदवारास संबंधित जिल्ह्यातून परीक्षेस बसण्याबाबत प्रवेशपत्र पाठविण्यात येईल.

९) माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परीक्षेकरिता एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांनी सर्व ठिकाणी परीक्षा शुल्क भरलेले आहे. तथापि, उमेदवारांना एकाच ठिकाणी परीक्षा देता येणार असलेने, संबंधित उमेदवारांनी भरलेले अधिकचे परीक्षा शुल्क प्राप्त करून घेण्यासाठी वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर आवश्यक बँकेतील नमूद करणे आवश्यक आहे.

१०) विकल्प नोंदविताना काही अडचणी उद्भवल्यास उमेदवारांनी **०७२९२००६३०५** या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. वरीलप्रमाणे भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासन स्तरावर राखून ठेवण्यात येतील.

**कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभाग पदभरती सन-२०१९ मधील नवीन दिव्यांग प्रवर्गाचे पदांची व एस.ई.बी.सी. प्रवर्गाचे आरक्षण रद्द झालेने समांतर आरक्षणात बदल झालेल्या पदांची**

**जाहिरात क्रमांक - १ /२०२१**

**जिल्हा परिषद, कोल्हापूरचे** अधिनस्त आरोग्य विभागाकडील सरळसेवेने भरावयाची गट-क संवर्गातील पदांची जाहिरात ३ मार्च २०१९ रोजी प्रसिद्ध करून योग्य उमेदवारांकडून विहित नमुन्यात व ऑनलाईन पद्धतीने, अर्ज मागविण्यात आले होते. त्यामध्ये दिव्यांगाकरिता ३ % प्रमाणे आरक्षण निश्चित करून दर्शविणेत आले होते. ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र. ९९/आस्था-८, दिनांक १४ जून २०२१ अन्वये कळविलेनुसार दिव्यांगाकरिता ४% नुसार आरक्षण विहित केले आहे. नव्याने निर्माण दिव्यांग प्रवर्गाकरिता खाली दर्शविलेनुसार अर्ज हे **दि. ०१.०९.२०२१** रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते **दि. २१.०९.२०२१** रोजी **रात्री ११.५९** वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने स्वीकारणेत येतील.

**पद भरतीसाठी संवर्गनिहाय रिक्त पदे**

| अ.क्र. | संवर्ग | दिव्यांग नवीन प्रवर्ग | पदसंख्या |
|---|---|---|---|
| ०१ | औषध निर्माता | AAV, ASD (M), SLD, MI & MD (Involving a to c) | १ |
| ०२ | आरोग्य सेवक (पुरुष) ४० % | AAV, SLD, MI & MD (Involving a to d) | १ |
| ०३ | आरोग्य सेवक (पुरुष) ५० % फवारणी | AAV, SLD, MI & MD (Involving a to d) | १ |
| ०४ | आरोग्य सेवक (महिला) | AAV, SLD, MI & MD (Involving a to d) | ३ |

**सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गाचे आरक्षण रद्द झालेने सदर प्रवर्गातील राखीव जागा अराखीव प्रवर्गात वर्ग झाल्या आहेत. त्यामुळे समांतर आरक्षणात झालेल्या बदलानुसार उपलब्ध होणारी पदे खालीलप्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | संवर्ग | समांतर आरक्षणामध्ये उपलब्ध होणारी पदसंख्या |
|---|---|---|
| ०१ | औषध निर्माता | १ |

सरळसेवा भरती प्रक्रियेसंदर्भातील सविस्तर जाहिरात www.zpkolhapur.gov.in व www.maharddzp.com या संकेतस्थळांवर उपलब्ध असून, सदर जाहिरातीत भरावयाच्या पदांची नावे, संख्या, पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व लेखी परीक्षेचे वेळापत्रक, विहित वयोमर्यादा, लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, सर्वसाधारण सूचना, विशेष सूचना, पदांच्या निवडीसाठीची विहित कार्यपद्धती, अटी व शर्ती, विहित परीक्षा शुल्क, अर्ज करण्याची पद्धत व सर्व पदांसाठीच्या समान सूचना दिलेल्या असून उमेदवारांनी ही संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच अर्ज करावेत. अर्जाचा नमुना उक्त संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवाराने सदरचा अर्ज जाहिरातीत नमूद पद्धतीनुसार व सूचनांनुसार अर्ज भरावा.

१. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द झाले असल्याने सदर प्रवर्गातील राखीव जागा अराखीव जागेत रूपांतरित झाल्या आहेत. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणमध्ये वाढ किंवा घट होत आहे. सदर समांतर आरक्षणातील बदलामुळे वाढलेल्या प्रवर्गाचे उमेदवारांने यापूर्वी खुल्या अथवा इतर प्रवर्गात अर्ज सादर केला असल्यास त्यास नव्याने वाढलेल्या समांतर आरक्षणांच्या प्रवर्गाचा विकल्प द्यावा लागेल.

२. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील जागा अराखीव प्रवर्गात रूपांतरित झालेल्या जागांकरिता वयोमर्यादा तसेच परीक्षा शुल्कही खुल्या प्रवर्गानुसार राहील.

३. नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवारांनी यापूर्वीच्या जाहिरातीनुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गात अर्ज केला असल्यास अशा वरीलपैकी उमेदवाराने सुधारित विकल्प www.maharddzp.com या संकेतस्थळावर नोंदविणे आवश्यक आहे.

४. माहे मार्च २०१९ चे जाहिरातमधील औषध निर्माण अधिकारी, संवर्गातील **एस.बी.सी.** प्रवर्गातील १ पद कमी झालेले आहे.

सदर भरती प्रक्रियेबाबत अद्ययावत सूचनांचे निवेदन www.zpkolhapur.gov.in व www.maharddzp.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल आणि भरती प्रक्रियेच्या कालावधीमध्ये माहितीबाबत अद्ययावत राहण्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवारांची राहील.

दिनांक : २५/०८/२०२१

सही/- **सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा,**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

सही/- **सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

सही/- **अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा,**
**जिल्हाधिकारी, कोल्हापूर**